## महत्त्वाचे

### तरुणाला मारहाण; सहा जणांवर गुन्हा

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – मागील भांडणाच्या कारणावरून सहा जणांनी रिक्षा चालक तरुणाला लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना रविवारी (२९ सप्टेंबर) रात्री सव्वा नऊच्या सुमारास इम्पेरिअल चौक, माळीवाडा येथे घडली. संतोष अशोक भिंगादिवे (वय ३६ रा. अशोकनगर, भिंगारदिवे मळा, गुलमोहर रस्ता, सावेडी) असे मारहाण झालेल्या व्यक्तीचे नाव आहे. त्यांनी शनिवारी (३० सप्टेंबर) दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अनिकेत आरोळे (रा. केडगाव), सिध्दार्थ उर्फ भावड्या वाघचौरे (दोघे रा. नालेगाव), मयुर वाघचौरे (रा. पाईपलाईन रस्ता, सावेडी) व दोन अनोळखी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संतोष भिंगारदिवे हे रविवारी रात्री सव्वा नऊच्या सुमारास इम्पेरिअल चौक येथे असताना संशयित आरोपी तेथे आले. त्यांनी संतोष यांना मागील भांडणाच्या कारणावरून लाकडी दांडके व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जखमी केले. 'तु जर परत रवीच्या नादी लागला तर तुला आम्ही जिवंत सोडणार नाही' अशी धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार संदीप पितळे करत आहेत.

### घरातून ५० हजारांच्या रोकडची चोरी

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – बोरूडे मळा येथील अजिंक्य नगरमध्ये राहणाऱ्या एका ड्रायव्हरचे घर फोडून चोरट्यांनी ५० हजारांची रोकड चोरून नेली. सोमवारी (३० सप्टेंबर) सकाळी साडेदहा ते दुपारी अडीच या वेळेत ही घटना घडली. याप्रकरणी प्रशांत पंडित ताठे (वय ४१) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ताठे हे सोमवारी सकाळी कुटुंबासह चुलते राजेश छबन ताठे यांच्या घरी ताठेमळा येथे गेले होते. दुपारी कार्यक्रम संपल्यानंतर त्यांच्या मुली घरी गेल्या असता चोरी झाल्याचे समोर आले. घरातील किचनच्या खिडकीची काच काढून गजाच्या साहाय्याने दरवाजा उघडून चोरट्यांनी प्रवेश करत रोकड चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार रमेश शिंदे करत आहेत.

### अल्पवयीन मुलीला पळविले

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – राहत्या घरातून अल्पवयीन मुलीला (वय १५) अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची घटना नगर तालुक्यातील एका गावात घडली. याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीच्या आईने दिलेल्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी या नगर तालुक्यातील एका गावात कुटुंबासह राहतात. त्यांची अल्पवयीन मुलगी शनिवारी (२८ सप्टेंबर) रात्री घरात झोपलेली होती. रविवारी (२९ सप्टेंबर) पहाटे दोन ते सकाळी सहा वाजेच्या दरम्यान तिला अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेले. सदरचा प्रकार फिर्यादी व नातेवाईकांच्या लक्षात येताच त्यांनी मुलीचा सर्वत्र शोध घेतला परंतु ती मिळून आली नाही. फिर्यादी यांनी सोमवारी (३० सप्टेंबर) भिंगार कॅम्प पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला असून मुलीचा शोध घेत आहेत. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक निसार शेख करत आहेत.

### दोघांकडून तरुणाला मारहाण

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – बिअरची बाटली मारून तरूणाला जखमी केल्याची घटना रविवारी (२९ सप्टेंबर) रात्री सव्वा नऊच्या सुमारास नागापुरातील पितळे कॉलनी येथील मैदानावर घडली. अमोल रावसाहेब उगले (वय ३७ रा. रेणुकानगर, नागापूर) असे मारहाण झालेल्या तरूणाचे नाव आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सोमवारी (३० सप्टेंबर) एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दीपक मधुकर सावंत, चंद्रभान जाधव (पूर्ण नाव नाही, दोघे रा. रेणुकानगर, नगर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. रविवारी रात्री अमोल उगले हे पितळे कॉलनीतील मैदानावर असताना संशयित आरोपी तेथे आले. त्यांनी अमोल यांना केस मागे घे नाही तर तुझे हातपाय काढून टाकेन अशी धमकी दिली. शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. बिअरची रिकामी बाटली हातावर मारून जखमी केले असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस अंमलदार टेमकर करत आहेत.

### वाहन-दुचाकीचा अपघात; वृध्दाचा मृत्यू

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – वाहन व दुचाकीची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात दुचाकीवरील वृध्दाचा मृत्यू झाला. सोपान मारूती लांडगे (वय ५८ रा. खंडाबे बुद्रुक ता. राहुरी) असे मयत वृध्दाचे नाव आहे. शनिवारी (३० सप्टेंबर) सकाळी सव्वा दहाच्या सुमारास देहरे (ता. नगर) शिवारातील स्वीटीराज नर्सरी समोर ही घटना घडली. याप्रकरणी टाटा कंपनीच्या वाहनावरील (एमएच १६ सीसी ९६५९) अनोळखी चालकाविरूध्द एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रताप नामदेव लांडगे (वय ४० रा. खंडाबे बुद्रुक) यांनी फिर्याद दिली आहे. शनिवारी सकाळी सोपान लांडगे हे त्यांच्याकडील दुचाकीवरून (एमएच १७ बीक्यू ८८८४) देहरे शिवारातून जात असताना सव्वा दहाच्या सुमारास त्यांच्या दुचाकीला स्वीटीराज नर्सरी समोर वाहनाची समोरून धडक दिली. या धडकेत सोपान लांडगे यांचा मृत्यू झाला असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### घर फोडून ३० हजारांची रोकड लांबविली

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – केडगाव उपनगरातील भूषणनगर मधील एका खासगी नोकरदार व्यक्तीचे घर फोडून ३० हजाराची रोकड अज्ञात चोरट्यांनी चोरून नेली. २५ सप्टेंबर रोजी सकाळी साडेअकरा ते २६ सप्टेंबर रोजी दुपारी साडेतीनच्या दरम्यान ही घटना घडली आहे. याप्रकरणी ३० सप्टेंबर रोजी कोतवाली पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल झाला आहे. विकास गुलाब धोत्रे (वय ३५ रा. भूषणनगर, केडगाव) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांनी कपाटात ३० हजारांची रोकड ठेवली होती. चोरट्यांनी घराचा कडीकोयंडा तोडून हॉल मधील कपाटातून ३० हजारांची रोकड चोरून नेली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### श्रीरामपूरच्या तरुणाला मारहाण

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – श्रीरामपूरचे मुलं अहमदनगरमध्ये कसे काम करतात ते बघतोच अशी धमकी देत तिघांनी नगर- श्रीरामपूर रेल्वेमध्ये भेळ विक्री करणाऱ्या तरुणाला मारहाण केली. सागर संजय तोरणे (वय २९ रा. पढेगाव, ता. श्रीरामपूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमवारी (३० सप्टेंबर) दुपारी पावणे दोनच्या सुमारास नगर रेल्वे स्टेशन जवळ ही घटना घडली. या प्रकरणी तोरणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संकेत साळवे उर्फ बंटी (रा. पंचशिलनगर, नगर) व त्याच्या सोबतच्या दोघा अनोळखी विरोधात कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तोरणे हे सोमवारी दुपारी नेहमी प्रमाणे श्रीरामपूर येथून रेल्वे मध्ये भेळ विक्रीसाठी आले होते. त्यांनी नगर रेल्वे स्टेशन समोरील हॉटेलमध्ये जेवण केले व परत रेल्वे स्टेशनकडे जात असताना संकेत व त्याच्या सोबतच्या दोघांनी त्यांना बंधुप्रेम हॉटेल जवळ अडविले. तू कोणासाठी काम करतो असे विचारले असता तोरणे यांनी त्यांच्या मालकाचे नाव सांगितले. त्यांनी तोरणे यांना शिवीगाळ करून लाकडी दांडक्याने मारहाण केली. तसेच श्रीरामपूरचे मुलं अहमदनगर मध्ये कसे काम करतात ते बघतोच असे म्हणून जीवे मारण्याची धमकी दिली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

# केडगावातील महिलेची एक कोटी ७० लाखांची फसवणूक

## अशोक सहकारी बँकेतून काढले कर्ज; सहा जणांविरूध्द पोलिसांत गुन्हा

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – केडगाव येथील महिलेच्या नावावर काही व्यावसायिकांनी अशोक सहकारी बँकेतून एक कोटी ७० लाख रुपयांचे कर्ज काढले होते. ते कर्ज परत न भरता त्यांची फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. सविता भानुदास कोतकर (वय ४८ रा. लक्ष्मी निवास, शाहुनगर, केडगाव) असे फसवणूक झालेल्या महिलेचे नाव आहे. त्यांनी काल, मंगळवारी (१ ऑक्टोबर) दिलेल्या फिर्यादीवरून सहा जणांविरूध्द कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

व्यावसायिक मयुर वसंतलाल शेटीया (वय ४७ रा. भुषणनगर, केडगाव), संदीप वालचंद सुराणा (वय ४२ रा. चास ता. नगर), सीए विजय मर्दा (वय ६२), गणेश दत्तात्रय रासकर (वय ४६, दोघे रा. धाडीवाल कॉम्प्लेक्स, एस.टी.स्टॅण्ड समोर, नगर), अशोक सहकारी बँकेच्या मार्केटयार्ड शाखेचा शाखाधिकारी अभय निघोजकर (वय ५४), व्यावसायिक सागर कटारीया (वय ४३ रा. भुषणनगर, केडगाव) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. मयुर शेटीया व इतरांनी फिर्यादी सविता कोतकर यांच्या नावावर २१ फेब्रुवारी २०१५ रोजी अशोक सहकारी बँकेच्या मार्केटयार्ड शाखेतून एक कोटी ७० लाख रूपयांचे कर्ज काढले होते. यातील एक कोटी ५० लाख रुपयांची रक्कम फिर्यादीच्या करंन्ट/चालू खात्यावर जमा झाली होती. कोणतेही देणे नसतानाही त्यातील ११ लाख १५ हजार रुपये मयुर शेटीया याच्या संम्यक ट्रेडर्स नावाने दिले गेले. तसेच कोणतेही देणे नसताना संदीप सुराणा याने एक कोटी ३१ लाख २० हजार रुपये काढून घेतले. याबाबत फिर्यादी यांनी संशयित आरोपींना विचारणा केली असता त्यांनी पती भानुदास महादेव कोतकर व त्यांचे भाऊबंद राहुल उर्फ दिलीप बबनराव कोतकर यांचा हवाला दिला. दरम्यान, यानंतर भानुदास कोतकर यांना एप्रिल २०१८ मध्ये एका गुन्ह्यात अटक करण्यात आली होती. ते तुरूंगात असताना सीए मर्दाच्या सांगण्यावरून डिसेंबर २०१८ मध्ये गणेश रासकर याने इन्कमटॅक्स भरण्याच्या नावाखाली चालू खात्याचे चेक बुक घेण्यासाठी कोऱ्या कागदावर फिर्यादीच्या सह्या घेतल्या. चेक बुक आल्यावर पाच कोऱ्या चेकवर सह्या घेऊन त्याचा गैरवापर केला. दरम्यान, या प्रकरणात बँकेचा मार्केटयार्ड शाखाधिकारी निघोजकर याने इतर संशयित आरोपींना मदत केली. ज्यामुळे फिर्यादीचे कर्ज खाते एन.पी.ए.मध्ये असताना कर्ज खात्यात जाणून बुजून रक्कमा जमा न करता त्या चालू खात्यात जमा केल्या आहेत. सदरच्या रक्कमा जमा करण्यासाठी निघोजकर याने फिर्यादीच्या चालू खात्याचा नंबर संशयित आरोपींना दिला.




दरम्यान, फिर्यादी यांना जेव्हा कर्ज मंजूर झाले तेव्हा ती रक्कम त्यांच्या चालू खात्यावर जमा झाली होती. ती रक्कम संशयित आरोपींनी संगणमताने काढून घेतली होती. त्या बाबतीत आयकर विभागाकडे तक्रार होण्याची भीती वाटल्याने त्यांनी फिर्यादीला रक्कम दिल्याचे दाखविले व ती रक्कम जाणून बुजून फिर्यादीच्या कर्ज खात्यावर जमा न करता चालू खात्यावर जमा करून ती त्वरीत काढून घेतली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

## नगर शहर विधानसभेसाठी भाजपचे आठ जण इच्छुक

### इच्छुकांच्या नावाची बंद पाकिटे पक्ष निरीक्षक प्रदेशाध्यक्षांकडे सुपूर्द करणार

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – विधानसभा निवडणुकीसाठी नगर विधानसभा मतदार संघातून भाजपच्या इच्छुक उमेदवारांची नावे जाणून घेण्यासाठी प्रदेश भाजपाचे पक्ष निरीक्षक महेश हिरे यांच्या प्रमुख उपस्थितीत काल, मंगळवारी शहर पदाधिकाऱ्यांची बैठक झाली. यावेळी नगर शहर विधानसभा निवडणुकीसाठी भाजपाकडून शहर जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, माजी शहर जिल्हाध्यक्ष महेंद्र गंधे, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, वसंत लोढा, राजेंद्र काळे, मुकुंद देवगावकर, सचिन पारखी व ज्योती दांडगे आदींनी उमेदवारीसाठी इच्छुक असल्याचे या बैठकीत घोषित केले.

बैठकीत शहरातून निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्यांना उपस्थित पदाधिकाऱ्यांनी पसंती क्रमांकाने मतदान करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. मतदानासाठी शहरातील २६६ प्रमुख पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली होती. पदाधिकाऱ्यांनी सुचवलेले इच्छुक उमेदवारांच्या नावाची बंद पाकिटे पक्ष निरीक्षक हिरे प्रदेशाध्यक्षांकडे सुपूर्द करणार आहेत. यावेळी हिरे म्हणाले, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून पूर्ण राज्यात इच्छुक उमेदवारांची नावे व पदाधिकाऱ्यांच्या मनातील उमेदवार जाणून घेण्यासाठी ही सुटसुटीत व चांगली मतदान प्रक्रिया राबवण्यात येत आहे. कोणताही वाद किंवा तक्रारी येवू नये यासाठी लोकशाहीच्या मार्गाने ही प्रक्रिया राबवण्यात आली. महायुतीच्या जागा वाटपात नगर शहर मतदार संघ भारतीय जनता पार्टीला सुटावा, अशी मागणी मी प्रदेशाकडे करणार आहे. प्रास्ताविकात ॲड. आगरकर यांनी नगर शहरातून पक्षाचे जे पदाधिकारी विधानसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत त्यांची नावे जाणून घेण्यासाठी हा लोकशाही मार्गाने उपक्रम राबवला जात असल्याचे सांगितले.

## पळवून नेऊन अल्पवयीन मुलीवर अत्याचार

### तरुण गजाआड; कोतवाली पोलिसांची कामगिरी

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर अत्याचार करणाऱ्या तरूणाला कोतवाली पोलिसांनी त्याच्या मामाचे गाव भानसहिवरा (ता. नेवासा) येथून ताब्यात घेत अटक केली आहे. चेतन संतोष सरोदे (रा. गांधीनगर बोल्हेगाव) असे त्याचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून पीडित अल्पवयीन मुलीची सुटका केली आहे.

दरम्यान, याप्रकरणी सुरूवातीला अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. यात वाढीव अत्याचार, पोक्सोचे कलम लावण्यात आले आहे. अल्पवयीन मुलगी २६ सप्टेंबर रोजी दुपारी साडेबाराच्या सुमारास कॉलेजच्या बाहेर झेरॉक्स काढण्यासाठी आली असता चेतन सरोदे याने तिला त्याच्या दुचाकीवर बळजबरीने बसवून गांधीनगर, बोल्हेगाव येथील रूमवर नेले. लाथाबुक्क्यांनी मारहाण करून तिच्यावर अत्याचार केला. कोतवाली पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने पीडितेसह तिला पळवून नेणाऱ्या चेतन सरोदेचा शोध घेतला असता तो त्याच्या मामाच्या गावी भानसहिवरा येथे असल्याची माहिती मिळाली होती. त्यांनी त्याला भानसहिवरा येथून ताब्यात घेत अटक केली. पीडितेच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल केला आहे. महिला पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे अधिक तपास करत आहेत.

निरीक्षक दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक योगीता कोकाटे, उपनिरीक्षक मुगडे, गुन्हे शोध पथकाचे अंमलदार रोहिणी दरंदले, योगेश भिंगारदिवे, विशाल दळवी, सलीम शेख, सूर्यकांत डाके, अमोल गाढे, अभय कदम, सतीश शिंदे, अतुल काजळे, सोनल भागवत, राहुल गुंडू यांनी ही कामगिरी केली आहे.

## शेत जमिनीच्या वादातून दरेवाडीत हाणामारी

### परस्परविरोधी फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिसांत गुन्हा

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – दरेवाडी (ता. नगर) शिवारात एका शेतकऱ्याच्या शेतात लोखंडी जाळीचे कंपाउंड तोडून शेतकऱ्याला मारहाण केल्याची घटना सोमवारी सकाळी साडेदहा वाजता घडली. या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात सात जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मच्छिंद्र भानुदास बेरड (वय ४२, रा. दरेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे.

संतोष लहानू सूर्यवंशी, हरिभाऊ खर्से (पूर्ण नाव पत्ता माहीत नाही), पवन रामप्रसाद धूत (रा. सारसनगर), जगदीश रामविलास करवा (रा. फलटण, जि. सातारा), सिध्दार्थ बाळासाहेब भिंगारदिवे (रा. दरेवाडी), संतोष सूर्यवंशी याची दोन मुले (नाव माहित नाही, रा. सारसनगर) यांच्या विरोधात हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बेरड हे शेत जमिनीत काम करत असताना संशयित आरोपींनी शेतीच्या लोखंडी जाळीचे कंमाउंड तोडून नुकसान केले. त्याचा जाब विचारल्यावर बेरड यांना शिवीगाळ, लाथाबुक्क्यांनी मारहाण करत जिवे मारण्याची धमकी दिली. बेरड यांची दुचाकी पेट्रोल टाकून पेटवून दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. दरम्यान, या प्रकरणी जागामालक पवन धूत यांनी त्यांचे वकील ॲड. पीयूष पुरोहित यांच्यासमवेत पत्रकार परिषद घेऊन बेरड यांनी केलेले आरोप फेटाळून लावले.

दुसऱ्या गटाकडून हरिभाऊ जिजाबा खर्से (रा. बुऱ्हाणनगर) यांनी फिर्याद दिली आहे. त्यानुसार मच्छिंद्र भानुदास बेरड, दीपमाला मच्छिंद्र बेरड, रंभा भानुदास बेरड, साईनाथ विठ्ठल साळुंखे, आशा निंबाळकर (पूर्ण नाव माहित नाही, सर्व रा. दरेवाडी) यांच्या विरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खर्से हे कंपाउंडचे काम करत असताना संशयित आरोपींनी 'माझ्या शेताच्या तारेचे कंपाउंड का पाडले', असे म्हणत शिवीगाळ करून लाथाबुक्क्यांनी तसेच लाकडी दांडक्याने मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## लोढा हाईट्समधील जुगार अड्ड्यावर छापा

### कोतवालीची कारवाई; आठ जुगारी पकडले

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – शहरातील नेता सुभाष चौकातील लोढा हाईट्स बिल्डींगमध्ये सुरू असलेल्या तिरट जुगार अड्ड्यावर कोतवाली पोलिसांनी मध्यरात्री छापा टाकून कारवाई केली. जुगार खेळणाऱ्या आठ जणांना पकडले असून त्यांच्या ताब्यातून जुगार साहित्य, २० हजारांची रोकड जप्त केली आहे. पोलीस अंमलदार सुरज कदम यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. काल, मंगळवारी (१ ऑक्टोबर) रात्री साडेबारा वाजता पोलिसांनी ही कारवाई केली.

प्रकाश रमणलाल शहा (रा. आनंद पार्क, आनंदी बाजार), सिध्देश संजय भसमे (रा. मल्हार चौक), संदीप बाबुलाल भगुरे ( रा. आदर्श गौतम नगर, रेल्वे स्टेशन), सचिन प्रभाकर परदेशी (रा. बुऱ्हाणनगर, ता. नगर), किसन धर्माय्या बतिन (रा. शेरकर गल्ली, बागडपट्टी), शहाजी रामभाऊ साळुंके (रा. बुऱ्हाणनगर), योगेश तानाजी घोरपडे (रा. सिध्दार्थनगर, नगर), मोहसिन अफजल पठाण (रा. एकनाथनगर, केडगाव) अशी पकडलेल्या जुगाऱ्यांची नावे आहेत. निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक योगिता कोकाटे, पोलीस अंमलदार दीपक रोहकले, तानाजी पवार, सुजय हिवाळे, अनुप झाडबुके, कदम यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

## आ. जगताप यांच्या फाउंडेशनचा रस्ता अडवून होम मिनीस्टर कार्यक्रम

### आयोजकांविरूध्द तोफखाना पोलिसांत गुन्हा दाखल

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – संग्राम जगताप सोशल फाऊंडेशन आयोजित अजिंक्य युवा प्रतिष्ठानने रस्ता आडवून होम मिनीस्टर कार्यक्रम घेतल्याने तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजिंक्य युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश अदमाने (रा. सावेडी) याच्याविरूध्द हा गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस अंमलदार तनवीर शेख यांनी फिर्याद दिली आहे.

संग्राम जगताप सोशल फाउंडेशन आयोजित अंजिक्य युवा प्रतिष्ठानने सोमवारी (३० सप्टेंबर) गंगा उद्यान गार्डन चौक, तारकपूर येथे होम मिनीस्टर कार्यक्रम आयोजित केला होता. याबाबतची माहिती तोफखाना पोलिसांना मिळाल्यानंतर पोलीस निरीक्षक आनंद कोकरे, पोलीस अंमलदार वसीम पठाण, दत्तात्रय जपे, सतीष त्रिभुवन, रावसाहेब खेडकर, सौरभ त्रिमुखे, योगेश खामकर यांचे पथक सदर ठिकाणी गेले. तारकपूर ते संत निरंकारी भवन व तारकपूर ते तोफखाना पोलीस ठाण्याकडे जाणाऱ्या- येणाऱ्या रस्त्यावर लोकांना अडथळा निर्माण होईल, अशा पध्दतीने रस्त्याच्या मधोमध स्टेज उभा केल्याचे पोलीस पथकाच्या लक्षात आले. त्यांनी याबाबत आयोजकांना सांगितल्यानंतरही त्यांनी याकडे दुर्लक्ष केले. म्हणून पोलिसांनी फिर्यादी होत अजिंक्य युवा प्रतिष्ठानचा अध्यक्ष अदमाने विरोधात पोलिसांच्या आदेशाचे पालन न करणे, जिल्हाधिकारी यांच्या आदेशाचा भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संगमनेर विभागाला सोनवणे नवे उपअधीक्षक

### गृह विभागाचे खेडकर यांची नाशिक जिल्ह्यात बदली

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – संगमनेर विभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारीपदी (पोलीस उपअधीक्षक) कुणाल शंकर सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे तर, येथील गृह विभागाचे पोलीस उपअधीक्षक हरिश दत्तात्रय खेडकर यांची नाशिक ग्रामीण उपविभागाच्या उपविभागीय पोलीस अधिकारी पदावर बदली करण्यात आली आहे. दरम्यान, त्यांच्या जागी अद्याप कोणाला नियुक्ती दिली गेली नाही. राज्याच्या गृह विभागाने काल, मंगळवारी (१ ऑक्टोबर) राज्यातील पोलीस उपअधीक्षक दर्जाच्या अधिकाऱ्यांचे बदली आदेश काढले आहेत.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्थानिक जिल्हा असलेल्या व एकाच जिल्ह्यात तीन वर्षांपेक्षा अधिक कार्यकाळ पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला दिले आहेत. यामुळे राज्याच्या गृह विभागाने काल राज्यातील १२ पोलीस उपअधीक्षकांच्या इतरत्र बदल्या केल्या आहेत. संगमनेर विभागाच्या पोलीस उपअधीक्षकपदी सोमनाथ वाघचौरे होते. मात्र त्यांना अतिरिक्त पोलीस अधीक्षक पदावर पदोन्नती मिळाल्याने हे पद रिक्त झाले होते. गृह विभागाचे उपअधीक्षक हरिश खेडकर यांच्याकडे संगमनेर विभागाचा प्रभारी कारभार देण्यात आला होता. मात्र खेडकर हे नगर जिल्ह्यातील रहिवाशी असल्याने त्यांची जिल्ह्याबाहेर बदली करण्यात आली आहे. यामुळे गृह विभागाचे पद रिक्त झाले आहे. दरम्यान, संगमनेरच्या उपअधीक्षकपदी नियुक्तीच्या प्रतिक्षेत असलेले कुणाल सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे संगमनेर विभागाला स्वतंत्र उपअधीक्षक मिळाले आहे. मात्र गृह विभागाचे पद रिक्त राहिले आहे. त्याजागी कोणालाच नियुक्ती देण्यात आलेले नाही.

दरम्यान, खेडकर यांनी यापूर्वी लाचलुचपत विभागाचे उपअधीक्षक म्हणून काम पाहिले आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांची गृह विभागाच्या उपअधीक्षकपदी नियुक्ती झाली होती. महिनाभर त्यांनी संगमनेरचे उपअधीक्षक म्हणून काम पाहिले.

## हत्याराचा धाक दाखवून महिलेचे गंठण हिसकावले

### सावेडी उपनगरातील घटना; अडीच तोळे लंपास

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – घरातून पायी फिरण्यासाठी बाहेर पडलेल्या महिलेच्या गळ्यातील अडीच तोळ्यांचे गंठण दुचाकीवरून आलेल्या दोघांनी हत्याराचा धाक दाखवून हिसकावून पळवले. सावेडी उपनगरातील गुलमोहर रस्त्यावर सोमवारी (३० सप्टेंबर) सायंकाळी ही घटना घडली.

या प्रकरणी सुनंदा ज्ञानेदव सुपेकर (वय ६२, रा. आसरा सोसयटी, नरहरीनगर जवळ, गुलमोहर रस्ता) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी सुपेकर या नेहमीप्रमाणे सायंकाळी पायी फिरण्यासाठी बाहेर पडल्या. त्या गुलमोहर रस्त्यावरील इंडियन बँकेच्या समोरून जात असतांना पाठीमागून दुचाकीवर आलेल्या दोघांनी त्यांना थांबवले. हत्यार दाखवून त्यांच्या गळ्यातील गंठण बळजबरीने हिसकावून तोडून नेले. यापूर्वीही गुलमोहर रस्ता व त्या लगतच्या परिसरात धूम स्टाईलने मंगळसूत्र चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. तरीही पोलिसांकडून कोणत्याही दक्षतेच्या उपाययोजना झालेल्या नाहीत. सततच्या घटनांमुळे महिलांमध्ये भीतीचे वातावरण आहे. दरम्यान, यापूर्वी महिलांच्या गळ्यातील दागिने ओरबडून नेले जात होते. आता महिलांना हत्याचारा धाक दाखवून त्यांच्याकडील दागिने बळजबरीने काढून घेतले जात असल्याचा प्रकार घडत असल्याने महिलांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## तरुणाचे डॉक्टर महिलेसोबत गैरकृत्य

### उपनगरातील प्रकार; तरुणावर पोलिसांत गुन्हा

**अहमदनगर (प्रतिनिधी)** – डॉक्टर असलेल्या महिलेच्या घरातील हॉलमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा ॲक्सेस तरुणाने स्वत:कडे घेऊन त्यांची बदनामी करून गैरकृत्य केल्याची घटना समोर आली आहे. उपनगरात राहत असलेल्या पीडित महिला डॉक्टरांनी दिलेल्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मयुर नंदकिशोर वाव्हळ (वय २८ रा. शास्त्रीनगर, केडगाव) असे गुन्हा दाखल झालेल्या तरुणाचे नाव आहे. फिर्यादी यांनी त्यांच्या पतीपासून घटस्फोट घेतला असल्याने त्या मुलासह उपनगरात राहतात. त्यांचे उपनगरातच भाडोत्री गाळ्यामध्ये क्लिनीक आहे. मागील एक वर्षापूर्वी (सन २०२३) फिर्यादी त्यांच्या क्लिनीकवरून घरी जात असताना मयुरने त्यांचा पाठलाग केला होता व तुमच्यावर प्रेम असल्याचे बोलला होता. त्यावेळी फिर्यादीने त्याला जाब विचारला असता त्याने त्यांना शिवीगाळ केली होती. तसेच ऑगस्ट २०२४ मध्ये त्याने एका व्यक्तीबरोबर फिर्यादीचे प्रेमसंबंध असल्याचे सांगून त्यांची बदनामी केली होती. २९ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री नऊच्या सुमारास मयुर हा फिर्यादीच्या क्लिनीकमध्ये आला व त्याने त्याच्या मोबाईलमध्ये फिर्यादीच्या घरातील हॉलमध्ये बसविलेल्या कॅमेऱ्याचे ॲक्सेस दाखविले व मला तु घरात काय करते हे सर्व दिसते असे म्हणाला यामुळे फिर्यादीच्या मनात लज्जा उत्पन्न झाली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. पोलीस अधिक तपास करत आहेत.